

निशाणी-धनुष्यबाण

मावळ लोकसभा मतदारसंघात केलेल्या कार्याचे

# विकासपर्व

कार्यअहवाल सन २०१९ ते २०२४

## खासदार श्रीरंग आप्पा बारणे

मावळ लोकसभा मतदार संघ



# रामो राजमणिः सदा विजयते..

(राजाओंमें श्रेष्ठ श्रीराम सदा विजयको प्राप्त करते हैं।)



**अयोध्यानरेश प्रभू श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा**

पौष शुक्ल पक्ष द्वादशी विक्रम संवत २०८० सोमवार, दि.२२ जानेवारी २०२४ रोजी
अवघ्या हिंदुस्थानात मोठ्या थाटात पार पडला.


प्रत्येक श्वास रयतेसाठी..
माझ्या राज्याच्या स्वराज्यासाठी..

# शिवरायांच्या प्रेरणेतून
# स्वराज्य आणि सुराज्य निर्माण होतंय...



।। शिवराज्याभिषेक सोहळा २०२३ ।।
किल्ले रायगड



श्रीरंग
आप्पा
बारणे





१२ फेब्रु.२००४ रोजी माझ्या संकल्पनेतून उभारलेले
छत्रपती शिवाजी महाराज यांचे उत्कृष्ठ भव्य शिल्प-डांगे चौक,थेरगाव

# साहेब,
# आपले विचार आणि स्मृती
# सदैव आमच्या मनात..







विद्यमान राष्ट्रपती मा.द्रौपदी मुर्मू यांजकडून
संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराचा गौरव स्विकारताना



माजी राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील यांची सदिच्छा भेट



माजी राष्ट्रपती मा. रामनाथ कोविंद यांना
जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची गाथा भेट देताना



माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांची सदिच्छा भेट



लोकसभा अध्यक्ष मा.ओम बिरला यांना
हिंदू नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त गुढी देऊन शुभेच्छा देताना



उपराष्ट्रपती मा.जगदीप धनखड यांजकडून
संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराचा गौरव स्विकारताना



# शिल्पकार नव्या भारताचे..  नेतृत्व वैभवशाली भविष्याचे..



सत्यमेव जयते

प्रधान मंत्री

Prime Minister

नई दिल्ली

7 मार्च 2024

**श्री. श्रीरंग आप्पा बारणे जी,**

महाराष्ट्र के मावल निर्वाचन क्षेत्र का प्रतिनिधित्व करते हुए, संसद सदस्य के रूप में आपका कार्यकाल पूरा होने पर आपको मेरी हार्दिक बधाई और शुभकामनाए । अपने निर्वाचन क्षेत्र में प्रमुख उपलब्धियों पर एक कार्यपुस्तिका लाने की आपकी पहल वास्तव में एक महान कार्य है ।

अपने निर्वाचन क्षेत्र में अमृत भारत स्टेशन परियोजना के तहत रेल्वे स्टेशन सुधार हेतू कार्य प्रगती पर है । नई मुंबई में बन रहा हवाई अड्डा सबसे बडा यातायात करनेवाला हवाई अड्डा होगा । मुंबई में बना अटल सेतू देश का सबसे लंबा समुद्री पुल है, यह पुल बनने से यातायात में भारी प्रभाव पडेगा । पूना में मेट्रो के कार्य को मंजूरी मिली है, आगे चलके कई सारे मार्ग पूरा करनेमें आपका प्रयास है तथा कई सारी सरकारी योजनाओंको आम लोगो तक पहूँचानेके कार्य की दिशा में आपके प्रयास महत्वपूर्ण हैं। अपने निर्वाचन क्षेत्र के लोगों के प्रति आपको गहरी भावना का संकेत है ।

मुझे यकीन है कि आप आने वाले कई वर्षों तक अपने निर्वाचन क्षेत्र, समाज और राष्ट्र के सेवा करते रहेंगे ।

आपका,

(नरेंद्र मोदी)

# कुशल संघटनकर्ता.. निर्णयकुशल नेतृत्व..



भारतरत्न, माजी उपपंतप्रधान
मा.लालकृष्ण अडवाणी
यांची प्रेरणादायी भेट



राष्ट्रीय स्वयंसेवक
संघाचे सरसंघचालक
मा.मोहनजी भागवत
यांची प्रेरणादायी भेट



देशाचे गृहमंत्री
मा.अमितजी शहा
यांची प्रेरणादायी भेट

# शिलेदार.. प्रगतिशील महाराष्ट्राचे..








# मनातलं थोडसं..

## लोकहिताची तळमळ आणि विश्वासाचे पाठबळ..

सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कार्यरत रहाण्याचे उद्दिष्ट ठेवले. कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसताना देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत जाण्याचा व लोकसभेचा पिठासीन अधिकारी होण्याचा मान मावळ लोकसभा मतदारसंघातील जनतेने मला दिला याबद्दल मतदारांविषयी प्रथमता कृतज्ञता व्यक्त करतो.

ज्यांची ध्येय सुस्पष्ट असतात त्यांची वाटचालही तितक्याच आत्मविश्वासाने आणि दूरदृष्टीने होत असते. म्हणूनच राजकीय जीवनात कार्यरत असताना लोककल्याण आणि जनहित हे सुस्पष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आजवरची वाटचाल मी करीत आलो आहे.

लोकांच्या रोजच्या जगण्याचे प्रश्न हा माझ्या आजवरच्या कामाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. मग तो पाण्याचा प्रश्न असो वा रोजच्या रहदारीचा. जनतेला सुविधा प्राप्त होण्यासाठी विकासकामांचा पाठपुरावा करणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, लोकहिताच्या कामांसाठी सातत्याने आग्रही राहणे आणि लोकसेवेचे व्रत अंगीकारणे हे मी अगदी मनापासून करीत आलो आहे. त्यामुळेच लोकांनीही माझ्यावर भरभरून विश्वास टाकलेला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रोचा प्रश्न मार्गी लावून पिंपरी ते भक्ती-शक्ती निगडी चौकापर्यंतच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. पनवेल महामेट्रोच्या रखडलेल्या प्रकल्पाला गती दिली असून मेट्रो कार्यरत झाली आहे. रेल्वे या शहरांना जोडणाऱ्या वाहिन्या असतात, त्यामुळे शहराचा विकास होतो. प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन रेल्वे स्थानकांचा विकास करण्याकरिता पुढाकार घेतला. अमृत भारत योजने अंतर्गत आकुर्डी, तळेगाव, देहूरोड, चिंचवड या स्टेशनचा समावेश करून स्टेशनच्या आधुनिकीकरणाच्या कामास सुरुवात केली. याचबरोबर पर्यटनाला चालना देण्याकरीता लोणावळा, नेरळ याही स्टेशनचे आधुनिकीकरण व सुशोभीकरण कामास प्रारंभ केला आहे.

पुणे-लोणावळा लोहमार्गावर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेसाठी केंद्र व राज्यामध्ये प्रत्येकी ५०% खर्चाची विभागणी होणार असून राज्याच्या अर्थसंकल्पात हा खर्च मंजूर करण्यात आला आहे. तसेच कर्जत ते पनवेल नव्याने लोहमार्गाचे काम चालू आहे. पनवेल ते उरण हा लोहमार्ग, खारघर पासून पनवेलच्या इतर भागात मेट्रो, पिंपरी-चिंचवड येथे पासपोर्ट कार्यालय, पुणे-मुंबई मिसिंग लिंक बोगदा, अटल सेतु (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड), पनवेल-जेएनपीटी ८ पदरी रस्ता इ. महत्वकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्यास यशस्वी ठरलो.

कोरोनाचा काळ हा सगळ्यांसाठीच अत्यंत अवघड असा काळ होता. या काळात लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी मी समर्थपणाने निभावण्याचा आणि लोकांसाठी आश्वासक आधार बनण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वातंत्र्यानंतरही देशात अशी अनेक गावे आहेत ज्या गावांमध्ये अद्याप रस्ते आणि वीजसुध्दा पोहोचलेली नाही. अशा कर्जत तालुक्यातील तुंगी, भागुचीवाडी या आदिवाशी गावांमध्ये ७० वर्षानंतर रस्ते आणि वीज पोहोचवण्याचे काम माझ्या हातून झाले यासाठी मी स्वत:लाच धन्य समजतो.

पिंपरी-चिंचवड आणि मावळवासियांचा पाणीप्रश्न सुटावा यासाठी गेली ८ वर्षे पवना धरणातील गाळ लोकसहभागातून काढला आहे. पर्यटन विकासाची दूरदृष्टी राखून माथेरानमधील बंद पडलेली टॉय ट्रेन पुन्हा सुरु केली, कार्ल्यातील एकवीरा गडावर रोपवे आणि मंदिर विकासकामांना गती देण्याचे काम केले. तसेच लोणावळा व माथेरान पर्यटन विकासास चालना देण्यासाठी नियोजनबध्द प्रयत्न करणे यावर माझा सातत्याने भर राहिलेला आहे.

लोकसभेच्या कामकाजात नेहमीच अग्रेसर राहिलो. लोकसभेत माझी उपस्थिती, कामामध्ये सहभाग घेणे या सर्व कामगिरीवर मी संसदेच्या कामकाजातील पहिल्या स्थानावर राहिलो. याची दखल घेऊन मला 'संसदमहारत्न' या उपाधीने गौरविण्यात आले, ही माझ्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. खासदार म्हणून माझी भूमिका व कर्तव्य निभावत असताना केलेल्या कामाची ही पावतीच म्हणायला हवी. परंतु याहीपेक्षा एक मोठा पुरस्कार मला मिळालेला आहे तो म्हणजे लोकांचा विश्वास! त्या विश्वासाच्या बळावरच माझी राजकीय जीवनातील वाटचाल सुरु आहे.

देशाचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हि विकासकामांची घोडदौड सुरू आहे.

मी माझ्या स्वभावात व कामात कधीही बदल करू दिला नाही. जनहित हेच माझे ध्येय मानून मावळ लोकसभा मतदारसंघात केलेल्या महत्त्वाच्या विकासकामांचा लेखाजोखा या अहवालाच्या रुपाने आपल्यासमोर मांडताना मला नक्कीच आनंद होतो आहे. या विकासपर्वाची दखल घेऊन पुढील काळातही हा विश्वासाचा आधार अबाधित राहिल अशी खात्री मला वाटते.



**- श्रीरंग आप्पा बारणे**

संसद महारत्न खासदार,
मावळ लोकसभा



विकासपर्व

# उत्कृष्ट संसदपटू व महासंसदरत्न खासदार



सकाळ

पिंपरी-चिंचवड

मंगळवार, ३० मे २०२३

## सलग सात वेळा 'संसदरत्न'

▸ जयंत जाधव

नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष ते खासदार असा राजकीय प्रवास झालेल्या श्रीरंग ऊर्फ आप्पा बारणे यांची खासदारकीची ही दुसरी पंचवार्षिक (टर्म) आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून ते शिवसेना-भाजप महायुतीच्या वतीने शिवसेनेच्या उमेदवारीवर प्रथम निवडून आले. संसदेतील उपस्थिती, चर्चेतील सहभाग, प्रश्न उपस्थित करणे व खासगी सदस्य विधेयक मांडणे अशा कामगिरीच्या आधारे २०१५ पासून २०२१ पर्यंत सलग सात वेळा 'संसदरत्न' पुरस्कार मिळविण्याची कामगिरी खासदार बारणे यांनी केली आहे. प्राइम पॉइंट फाउंडेशन'च्यावतीने २०१५ ते २०१९ सलग पाच वर्षे 'संसद रत्न' व २०१९ मध्ये सहाव्यांदा 'संसद महारत्न' तर; २०२१ मध्ये 'संसद विशेष रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

### कर्जतच्या कुपोषणाचा मुद्दा

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत तालुक्यात दरवर्षी १० ते १२ बालके कुपोषित होत होती. चार वर्षांपूर्वी २ बालके दगावली होती. त्यामुळे कुपोषण मुक्त भारत करण्यासाठी त्यांनी पावले उचलण्याची गरज असल्याचा मुद्दा संसदेत उपस्थित केला होता. याबाबत केंद्र सरकारने कार्यवाही सुरू केली असून राज्य सरकारांशी बोलून त्यावर उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले होते, अशी माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

### 'जेएनपीटी' बंदराचा ८ पदरी रस्ता

'जेएनपीटी' बंदराला (पोर्ट) जाणारा पनवेल ते जेएनपीटी बंदर हा २५ किलोमीटरचा रस्ता अत्यंत खराब होता. या रस्त्यावर ३ ते ३.३० तास प्रवासाला लागायचे. रस्त्याच्या आजूबाजूला गावे असल्याने अपघात व्हायचे. हा मुद्दा संसदेत उपस्थित केला. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी त्यावर उत्तर दिले. त्यानंतर त्यांनी लक्ष घालून या रस्त्याचा विकास आराखडा अहवाल तयार केला व आता हा रस्ता ८ पदरी झाला आहे. त्यामुळे या भागात अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे.

श्रीरंग बारणे

शिवसेना

मावळ

**१४ टक्के** संसदेतील हजेरी

**१५०** चर्चेमध्ये सहभाग

**५४४** उपस्थित केलेले प्रश्न

**५३ कोटी** मिळालेला निधी

#### खासगी सदस्य विधेयके

- औद्योगिक रोजगार व पर्यावरण संरक्षण विधेयक २०२२.
- पुरातत्त्व नैसर्गिक वारसा संवर्धन व देखभाल विधेयक २०२२.
- महासागर थर्मल ऊर्जा वापर विधेयक २०२२
- रोजगार संस्था नियमन विधेयक २०१९
- राष्ट्रीय क्रीडा विकास आयोग विधेयक २०१९
- शाळांमध्ये खेळाद्वारे मुलांची अनिवार्य शारीरिक तंदुरुस्ती व क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास विधेयक २०१९.

#### मतदारसंघातील महत्त्वाची कामे

- पवना धरणातील गाळ लोकसहभागातून ७ वर्षे काढला
- माथेरानला १५० कोटींचा निधी राज्य सरकारमार्फत मिळवून दिला
- घारापुरी बेटावर एलिफंटा केव्हज येथे वीज पोचविली
- लोणावळा पर्यटन विकासासाठी ३.५ कोटींचा निधी मंजूर
- माथेरानच्या ऐतिहासिक 'ट्राय ट्रेन' साठी केंद्राकडून १०० कोटी
- वडगाव मावळमध्ये ८ कोटी रुपयांची समाज मंदिरांची विकास कामे

#### रखडलेली कामे

- पुणे ते लोणावळा रेल्वेचे चौपदरीकरण
- वडगाव मावळात दूरसंचारचे जाळे अनेक भागात नाही
- पवना धरणग्रस्तांना मोबदला व परतावा गेली ५० वर्षे मिळाला नाही
- पिंपरी चिंचवडला नियमित व सुरळीत पाणी पुरवठा
- रेडझोनचा प्रश्न अद्याप कायम.

" कर्जत तालुक्यात १०-१२ आदिवासी पाडे आहेत. या भागात देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून वीज, रस्ते, पाणी या काहीच सुविधा नव्हत्या. केंद्र शासनाच्या दिनदयाल ग्रामज्योती योजनेतून त्या पाड्यांवर प्रथमच वीज पोहचविली. जलजीवन मीशन योजनेद्वारे केंद्राचा ५० टक्के व राज्याचा ५० टक्के निधी उपलब्ध करून त्या पाड्यांवर पाणी दिले. खासदार निधी व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तेथे रस्ते केले. या कामांमध्ये वन विभागाच्या परवानग्या मिळविण्यासाठी ४-५ वर्षांचा कालावधी लागला.

- श्रीरंग बारणे, खासदार




केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त श्री. सुशीलकुमार चंद्रा यांच्या हस्ते 'संसद विशेष रत्न' पुरस्कार देऊन दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले.



संसद महारत्न पुरस्कार २०२१




संसद उत्कृष्टरत्न पुरस्कार २०२४






## पीठासीन अधिकारी

लोकशाहीचा गाभारा असलेल्या सर्वोच्च सभागृहात अनेक महान नेत्यांनी योगदान दिले आहे. वैभवशाली परंपरा असलेल्या लोकसभेचे पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज चालविण्याची संधी मिळाली आहे. सभागृहाच्या महान परंपरेचे वैभव आणि गरिमा अबाधित ठेवण्याचा मी नक्कीच प्रयत्न करेन. मावळच्या जनतेमुळेच मला या पदावर काम करण्याची संधी मिळत आहे.

## लोकसभेतील कामगिरी

- **९४% उपस्थिती**
- **१६१ वेळा लोकसभेतील चर्चेत सहभाग**
- **लोकसभेत ६१७ प्रश्न उपस्थित केले**
- **लोकसभेत १३ खाजगी विधेयके मांडली**

## महासंसदरत्न

१६ व्या आणि १७ व्या लोकसभेत केलेली उत्कृष्ट कामगिरी यामुळे लोकसभेतील सर्वोत्कृष्ट संसदिय कामकाजासाठी दिला जाणारा **‘संसद महारत्न पुरस्कार’** प्रदान करण्यात आला.

१६ व्या लोकसभेत सलग **५ वेळा संसदरत्न पुरस्कार**

सन २०१९ मध्ये **सहाव्यांदा संसद महारत्न पुरस्कार**

सन २०२१ मध्ये **संसद विशिष्ट रत्न** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

देशातील विविध विषयांवर संसदेत उपस्थित केलेले प्रश्न, सर्वाधिक चर्चेतील सहभाग, संसदेतील उपस्थिती तसेच स्थानिक खासदार विकासनिधीचा संपूर्ण वापर या अष्टपैलू कामगिरीबद्दल **‘संसद विशिष्ट रत्न पुरस्कार’** देण्यात आला.

# केंद्रीय मंत्री समवेत विकासकामाबद्दल बैठका



मावळ तालुक्यातील देहू ते देहूरोड एनएच४ पर्यंत संरक्षण विभागाच्या जागेतून जाणाऱ्या पालखी मार्गाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा.नितीनजी गडकरी यांची भेट



पिंपरी चिंचवड शहरातील रेडझोन व मावळ मधील मिसाईल प्रकल्पाचा प्रश्न मार्गी लागावा याबाबत केंद्रीय संरक्षणमंत्री मा.राजनाथ सिंह यांची भेट



मावळ लोकसभा मतदारसंघातील विविध रेल्वे विषयक कामांबाबत केंद्रीय रेल्वेमंत्री मा.अश्विनी वैष्णव यांची भेट घेताना



जेएनपीटी कंटेनर टर्मिनल खाजगीकरण केंद्र सरकारच्या धोरणाबाबत चर्चा करण्यासाठी केंद्रीय पोर्टमंत्री मा.मनसुखलाल मांडविय यांची भेट



हिंदुस्थान अँटिबायोटीक्स या कंपनी संदर्भात केंद्रीयमंत्री मा.सदानंद गौडा यांची भेट



तत्कालिन केंद्रीय रेल्वेमंत्री मा.पियुश गोयल व राज्यमंत्री मा.सुरेश अंगडी यांना भेटून आषाढीवारी निमित्त पंढरपूरला जादा रेल्वे गाड्या सोडण्याची मागणी करताना



परराष्ट्र मंत्री श्री. एस.जयशंकर यांची भेट घेऊन पनवेल येथील
मंजूरी दिलेले पासपोर्ट सेवा केंद्र चालू करण्याची मागणी करताना



पिंपरी ते निगडी भक्ती शक्ती चौकापर्यंत मेट्रो विस्तारीकरणास मंजूरी
मिळावी या करिता केंद्रीय शहरी विकासमंत्री मा.हरदीप सिंग पुरी यांची भेट



केंद्रीय महिला व बालविकास मंत्री श्रीमती स्मृती इराणी यांची भेट घेऊन
अंगणवाडी सेविकांच्या वेतनात वाढ करण्याची मागणी करताना



केंद्रीय पर्यटनमंत्री मा.प्रल्हाद पटेल यांच्याकडे कार्ला एकवीरादेवी गडाच्या
पायऱ्या दुरूस्ती, कठडे बांधण्याची मागणी करताना



केंद्रीय जलशक्तीमंत्री मा.गजेंद्रसिंह शेखावत यांची
मतदारसंघातील कामांबाबत भेट घेताना



उरण येथील करंजा मत्स्य बंदराच्या समस्या तसेच मत्स्य व्यावसायिकांच्या
समस्यांबाबत केंद्रीयमंत्री मा.पुरूषोत्तम रूपाला यांची भेट

# केंद्रीय मंत्री समवेत विकासकामाबद्दल बैठका



केंद्रीय पर्यावरणमंत्री मा.भुपेंद्र यादव यांना
नदी सुधार प्रकल्पासंदर्भात निवेदन देताना.



केंद्रीय राज्यमंत्री मा.रामदासजी आठवले यांची सदिच्छा भेट



मावळ लोकसभा मतदारसंघातील विविध रेल्वे विषयक कामांबाबत
केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री मा.रावसाहेब दानवे यांची भेट घेताना



पिंपरी चिंचवड मनपाचे कररूपी गोळा झालेले तब्बल ९८४.२६ कोटी
येस बँकेत अडकले. त्याबाबत केंद्रीय अर्थराज्यमंत्री मा.अनुराग ठाकूर यांची भेट



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या करिता संसदीय कार्य व
सांस्कृतिक राज्यमंत्री मा.अर्जुनराम मेघवाल यांची भेट



देहूरोड ऑडनस फॅक्टरी या दारूगोळा कारखाण्याजवळील
रेड झोन हद्द कमी करण्याबाबत निवेदन देताना.

# राज्यातील मंत्री समवेत विकासकामाबद्दल बैठका



मावळ मतदारसंघातील विविध विकास कामांसबंधी पालकमंत्री
मा.अजितदादा पवार यांची भेट घेताना.



विविध विकासकामांसंदर्भात महाराष्ट्र राज्याचे
उच्च शिक्षणमंत्री मा.चंद्रकांत पाटील यांना निवेदन देताना



इको सेंन्सीटीव्ह झोन संदर्भात महाराष्ट्र राज्याचे
वनमंत्री मा.सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देताना



मावळ मतदारसंघातील औद्योगिक कामांबाबत महाराष्ट्र राज्याचे
उद्योगमंत्री मा.उदय सामंत यांना निवेदन देताना



मावळ मतदारसंघातील जल जीवन मिशन योजनेसंदर्भातील कामांबाबत
राज्याचे पाणीपुरवठा मंत्री मा.गुलाबराव पाटील यांच्याशी चर्चा करताना



पिंपरी-चिंचवड मधील सायन्ससिटी उभारणी संदर्भात
शालेय शिक्षणमंत्री मा.दिपक केसरकर यांच्याशी चर्चा करताना

# संसदीय कार्यसमिती बैठका



केंद्रीय गृहमंत्री मा.अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय राजभाषा समिती बैठक प्रसंगी



वाराणसी येथे संसदीय राजभाषा समिती निरीक्षण बैठक प्रसंगी



प्रयागराज येथे संसदीय राजभाषा समिती निरीक्षण बैठक प्रसंगी




दिल्ली येथे संसदीय राजभाषा समिती निरीक्षण बैठक प्रसंगी




दिल्ली येथे संसदीय राजभाषा समिती निरीक्षण बैठक प्रसंगी



दिल्ली येथे हिंदी भाषा समिती निरीक्षण बैठक प्रसंगी

# शासकीय बैठका



पीएमआरडीए अंतर्गत रस्ते व इतर विकासकामांबाबत
पीएमआरडीए आयुक्त मा.सुहास दिवसे यांसोबत बैठक



देहुरोड कात्रज रोडवर पुनावळे भुयारी मार्गाने हिंजवडी आयटी पार्क जाणाऱ्या
मार्गावर सातत्याने ट्रॅफिक जाम समस्या बाबत आयुक्त, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी भेट



पनवेल भागातील नैनो प्रकल्पग्रस्त २३ गावातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत
सिडकोचे व्यवस्थापक मा.संजय मुखर्जी यांची भेट घेताना



पनवेल, उरण, जेएनपीटी पोर्ट राष्ट्रीय महामार्ग क्र.३४८ या महामार्गावरील
वाहतुक समस्या सोडविण्याबाबत उरण जेएनपीटी कार्यालयात बैठक



मावळ लोकसभेच्या मुंबई विभागात येणाऱ्या पनवेल, उरण, नेरळ, कर्जत, खोपोली
या विभागातील प्रश्नांबाबत मा.रजनीश के.गोयल डीआरएम मुंबई येथे बैठक घेताना



उरण भागातील ग्रामपंचायतींना जेएनपीटी पोर्टकडून विकासनिधी मिळावा
या करिता जेएनपीटीचे चेअरमन संजय शेठी यांच्या समवेत बैठक प्रसंगी



जेएनपीटी कंटेनर ट्रर्मिनल खाजगीकरणास स्थानिक कामगारांचा
प्रचंड विरोध असल्यामुळे जेएनपीटी कार्यालय उरण येथे बैठक




अलिबाग येथे रायगड जिल्हा विकास समन्वय (दिशा) समितीची बैठक प्रसंगी

# सदैव खंबीर साथ देणारे सहकारी



**मा.रामशेठ ठाकूर**
माजी खासदार



**मा. अमर साबळे**
माजी खासदार



**मा.प्रशांत ठाकूर**
आमदार, पनवेल



**मा.अश्विनीताई जगताप**
आमदार, चिंचवड



**मा. सुनिल शेळके**
आमदार, मावळ



**मा.आण्णा बनसोडे**
आमदार, पिंपरी



**मा.महेंद्र थोरवे**
आमदार, कर्जत-खालापूर



**मा.महेश बालदी**
आमदार, उरण



**मा.उमाताई खापरे**
आमदार, विधानपरिषद



**मा.सुरेश लाड**
माजी आमदार, कर्जत-खालापूर



**मा.बाळा भेगडे**
माजी आमदार, मावळ



**मा.रूपलेखाताई ढोरे**
माजी आमदार, मावळ



**मा.देवेंद्र साटम**
माजी आमदार, कर्जत-खालापूर



# भूमिपूजन व लोकार्पण सोहळे

विकासपर्व

निशाणी-धनुष्यबाण




पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन व
लोकार्पण सोहळा तसेच महानगरपालिका प्रशासकिय इमारतीचे भूमिपूजन प्रसंगी.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उपमुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन प्रसंगी.




मा.अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२२
प्रदान सोहळा प्रसंगी.



चिंचवड येथील सायन्स पार्क परिसरातील
तारांगण इमारत उद्घाटन प्रसंगी

# मेट्रोच्या संदर्भातील विकासकामे

## विकासपर्व





पीसीएमसी चौक ते भक्तीशक्ती चौक मेट्रो प्रकल्प सुरू व्हावा यासाठी केंद्रीय शहरी विकासमंत्री मा.हरदीप सिंग पुरी यांची भेट



### खासदार श्रीरंग बारणे यांची मेट्रो पाहणी

**पिंपरी, ता. १८ :** पुणे महामेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी या पहिल्या कॉरिडॉरचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे मेट्रो लवकरच पिंपरी-चिंचवडच्या सेवेत दाखल होईल. नागरिकांना जलद प्रवास करता येणार आहे. कमी वेळेत पुणे, स्वारगेटपर्यंत पोहचता येईल. रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होईल, असा विश्वास खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला. पिंपरी ते निगडी मेट्रोचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. निगडीपर्यंत मेट्रो करण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

खासदार बारणे यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी मेट्रोच्या कामाची पाहणी करून फुगेवाडी ते पिंपरीपर्यंत प्रवास केला. कामाची पाहणी केली. अडचणी जाणून घेतल्या. सहकार्याची ग्वाही दिली. माजी आमदार गौतम चाबुकस्वार, सहसंपर्कप्रमुख योगेश बाबर, मेट्रोचे अधिकारी हेमंत सोनवणे, राजेश त्रिवेदी, राजीव कुमार, शहरप्रमुख सचिन भोसले, संघटिका सुलभा उबाळे, ऊर्मिला काळभोर, नगरसेवक प्रमोद कुटे, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, माजी नगरसेवक संजय काटे, सरिता साने, राजेश वाबळे, बशीर सुतार, तुषार नवले, संतोष सौंदणकर आदी उपस्थित होते.

**फुगेवाडी :** फुगेवाडी ते पिंपरी स्थानकादरम्यान मेट्रोतून प्रवास करताना खासदार श्रीरंग बारणे व शिवसेना पदाधिकारी.

#### पिंपरी ते निगडी फेरप्रस्ताव

खासदार बारणे म्हणाले, "पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रोच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. अर्थ विभागाने मान्यता दिली आहे. केंद्राने फेरप्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला आहे. राज्य सरकार आपला आर्थिक सहभाग देऊन प्रस्ताव केंद्राकडे पाठवेल. त्यानंतर प्रत्यक्षात निगडीपर्यंतचे काम सुरू होईल. त्यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे."



निशाणी–धनुष्यबाण

# मेट्रो सिटी ओळख शहराची.. गतिशील विकासाची..

## निगडीपर्यंत धावणार मेट्रो

- पिंपरी–चिंचवड महानगरपालिका ते शिवाजीनगर या १३.९ कि.मी. मेट्रो प्रकल्पाचं पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले.
- पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो विस्तारीकरण व्हावे, म्हणून संसदेत प्रश्न उपस्थित केला.
- सततच्या पाठपुराव्यामुळे राज्यशासनाने निगडीपर्यंतच्या मेट्रोचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला. त्या प्रस्तावाला केंद्रीय नगरविकास मंत्र्यांनी मान्यता दिली.
- आता पिंपरी ते निगडी या विस्तारित मेट्रो मार्गावर चिंचवड, आकुर्डी आणि निगडी अशी तीन स्थानके असणार आहेत.





# मावळमध्ये रेल्वे सुसाट..

## विकासपर्व

चिंचवड व कर्जत येथे लांब पल्ल्यांच्या गाड्यांना पुन्हा थांबा देण्याबाबत रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा.

पुणे-लोणावळा लोहमार्गावर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेसाठी केंद्र व राज्यामध्ये प्रत्येकी ५०% खर्चाची विभागणी होणार असून राज्याच्या अर्थसंकल्पात हा खर्च मंजूर करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवडकरांसाठी पुणे-मुंबई सिंहगड एक्सप्रेसला दोन विशेष डब्बे जोडण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळालं असून रेल्वेकडून या ट्रेनला दोन राखीव डबे जोडण्यात आले.




पुणे-मुंबई सिंहगड एक्सप्रेसला दोन विशेष डब्बे जोडण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळालं प्रसंगी आनंदोत्सव साजरा करताना



मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड, वडगाव, शेलारवाडी, कान्हे फाटा, कामशेत येथे रेल्वे विभागामार्फत सुरु असलेल्या आणि विविध कारणांमुळे रखडलेल्या विकास कामांची पाहणी.



चिंचवड रेल्वेस्टेशन येथे श्रीमन महासाधु श्री मोरया गोसावी समाधी मंदिर व क्रांतीवीर चापेकर बंधु स्मारक नामफलक अनावरण प्रसंगी.



रेल्वे स्टेशन येथे प्रवाशांच्या समस्या जाणून घेताना.




लोणावळा रेल्वेस्टेशन आधुनिकीकरण काम सुरू. या मार्गावरील स्वयंचलित गेटचे काम पूर्ण.

लोणावळा गेट क्र. ३६,३८,४३,४५ उड्डाणपूल मंजूर.

कान्हेफाटा, वडगाव केशवनगर उड्डाणपूल कामास मंजूरी.

निशाणी–धनुष्यबाण

**पुणे–मुंबई रेल्वे मार्गावरील तळेगाव, शेलारवाडी, जांभूळ, कामशेत या भूयारी मार्ग रेल्वे कामास मंजूरी.**

**चिंचवड आणि तळेगाव रेल्वे स्टेशनचे ६ मी. रूंदी वाढविणे, एफओबी करण्याच्या कामास पाठपुरावा करून काम पूर्ण.**

**रेल्वे पुणे विभाग विविध ठिकाणी आर.ओ.बी. आणि एफ.ओ.बी. बनविण्याचे काम लवकरच सुरू.**

**चिंचवड, देहुरोड रेल्वे स्टेशन फेज२ काम सुरू.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेच्या प्रश्नांबाबत रेल्वेमंत्री मा.अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



मध्य रेल्वेचे महाप्रबंधक मा.संजीव मित्तल यांच्या सोबत लोणावळा रेल्वे स्टेशन पहाणी दौरा करून प्रवाशी व कर्मचारी यांच्या समस्या जाणून घेतल्या



पुणे–लोणावळा दुपारची लोकल धावली, रेल्वे राज्यमंत्री मा.रावसाहेब दानवे सोबत हिरवा झेंडा दाखविताना.



मावळ तालुक्यातील जांभूळ येथील रेल्वे भूयारी मार्गाचे उद्घाटन करताना



मावळ तालुक्यातील जांभूळ येथील रेल्वे भूयारी मार्ग

# रायगडचा रेल्वे विकास..

- कर्जत रेल्वेस्टेशन आधुनिकिकरण बाबत पाठपुरावा.
- नेरळ रेल्वेस्टेशन आधुनिकीकरण काम चालू.
- पनवेल रेल्वेस्टेशन आधुनिकीकरण काम सुरू
- कर्जत-पनवेल रेल्वे ट्रॅक काम चालू.
- खारकोपर-उरण रेल्वे मार्ग सुरू.
- नवी मुंबई मेट्रो मार्ग काम पूर्ण.



पनवेल, उरण, नेरळ, कर्जत, खोपोली
या विभागातील रेल्वे प्रश्नाबाबत
रजनीश के. गोयल यांच्या समवेत मुंबई येथे बैठक घेतली.



कर्जत रेल्वे स्टेशन पाहणी दौरा



पनवेल रेल्वे स्टेशन वरील सरकते जिने या कामाचे उद्घाटन प्रसंगी



नेरळ रेल्वे स्टेशन विस्तारीकरण बाबत रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा व सूचना करताना.



**रेल्वे प्रश्न मार्गी लागत आहे दळणवळण सोप्पे होत आहे**

कर्जत-पनवेल रेल्वे मार्ग

# अमृत भारत रेल्वे स्टेशन योजना

निशाणी-धनुष्यबाण

आकुर्डी, तळेगाव दाभाडे या रेल्वे स्टेशनचा अमृत भारत रेल्वे स्टेशन योजनेअंतर्गत समावेश झाला आहे. या अंतर्गत रेल्वे स्टेशनचा विस्तार, सर्व रेल्वे स्टेशन स्वयंचलित जीने, लिफ्टची कामे, आधुनिकीकरण, सुशोभिकरण कामे सुरू.

तळेगाव रेल्वे स्टेशनच्या विस्तारीकरणासाठी ४० कोटी ३५ लाख रूपयांचा निधी मंजूर.

आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या विस्तारीकरणासाठी ३३ कोटी ८ लाख रूपयांचा निधी मंजूर.



आकुर्डी रेल्वे स्टेशन येथे लिफ्टचे उद्घाटन प्रसंगी











**कायापालट होणार रेल्वे स्टेशनचा..**

**नवा चेहरा प्रगतिशील शहराचा..**



**विकासपर्व**



# रस्ते विकास

## जेएनपीटी बंदराचा ८ पदरी रस्ता :
## पनवेल ते जेएनपीटी बंदर हा २५ कि.मी. ८ पदरी रस्ता पुर्ण.

भारतातील सर्वात मोठे सागरी बंदर म्हणून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) कडे पाहीले जाते. यात मोठ्या प्रमाणावर सागरी माल वाहतुक होत असते. सदरचा भाग मावळ लोकसभा मतदारसंघात येतो.

पनवेल वरून जेएनपीटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कंटेनरची वाहतुक मोठ्या प्रमाणावर होते. हा रस्ता खूप छोटा असल्यामुळे या रस्त्यावर कायम वाहतुककोंडी होत असे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात घडून अनेक नागरीकांना आपला जीवही गमवावा लागला होता.

हा रस्ता व्हावा हि अनेक वर्षाची येथील नागरीकांची मागणी होती. या विषयावर संसदेत विषय मांडून रस्ता रूंदीकरण व्हावे, म्हणून जेएनपीटी तसेच सिडको व नॅशनल हायवे अथॉरिटी यांचेकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याचे यश म्हणजे सुमारे २५ किलोमीटरचा हा रस्ता आठ पदरी करण्याच्या कामाची मंजूरी मिळाली. त्यावर जेएनपीटी, सिडको व नॅशनल हायवे ॲथॉरिटी यांचे संयुक्त विद्यमाने २९०० कोटी रूपये मंजूरीनंतर या आठ पदरी मार्गाचे काम पुर्ण.




**रस्ते विकास समृद्धीचा महामार्ग**



पनवेल–जेएनपीटी रोड

# मुंबई-पुणे मिसिंग लिंक प्रकल्प



मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील लोणावळा ते खोपोली एक्झिट या भागातील पर्यायी रस्त्यासाठी तयार करण्यात येत असलेल्या बोगद्यांचे काम वेगाने सुरु आहे. जानेवारी २०२५ पर्यंत हा बोगदा वाहतुकीसाठी खुला होणार आहे. यामधील एक बोगदा १.७५ किलोमीटर लांब तर दुसरा ८.९३ किलोमीटरचा आहे. हे दोन्ही बोगदे लांबीच्या दृष्टिने देशात सर्वाधिक मोठे आहेत. हा प्रकल्प सुरु झाल्यावर वाहतूक सुरळीत होणार आहे. मुंबई–पुणे (Mumbai-Pune) अंतर लवकरच कमी होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ वाचणार आहे.



## का निर्माण केला हा प्रकल्प?

मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग भागामध्ये घाट व चढ उताराचे प्रमाण जास्त असून पावसाळ्यात दरडी कोसळण्याचे प्रकार वारंवार होत असतात. त्यामुळे मुंबईकडे येणारी डोंगरालगतची एक लेन ही पावसाळ्यात बंद ठेवावी लागते. या पार्श्वभूमीवर मुंबई–पुणे द्रुतगती मिसिंग लिंकचे काम एमएसआरडीसीकडून हाती घेण्यात आले आहे.



## आठ पदरी नवा रस्ता

या प्रकल्पामुळे बोर घाटातील सहा किलोमीटर वळणाच्या मार्गाला हा पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. लोणावळ्यापासून सुरू होणारा हा बोगदा पुढे खोपोली एक्झिट इथे संपणार आहे. पुण्याकडून मुंबईला जाताना असणारा बोगदा सुमारे ९ किलोमीटर लांबीचा असणार आहे. यातील साडेसहा किलोमीटर लांबीच्या बोगद्याचे खोडकाम पूर्ण झाले आहे. या बोगद्याची रुंदी २३.५ मीटर इतकी आहे.



**पुणे - मुंबई हायवे ट्रॅफिक, अपघात मुक्त करण्याचे ध्येय**



पुणे–मुंबई मिसिंग लिंक रोड

# अटल सागरी सेतू

- भारतातील सर्वाधिक लांबीचा समुद्र सेतू
- शिवडी ते न्हावा २१.८० किमी लांबीचा ६ पदरी पूल
- मुंबईला रायगडशी जोडणारी अखंड व थेट कनेक्टीव्हीटी
- मुंबई, नवी मुंबई, रायगड, मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई–गोवा महामार्ग यामधील अंतर कमी होणार

**₹१७,८४३ कोटी** एकुण खर्च

**२१.८० किमी** प्रोजेक्ट एकुण लांबी

**१८.१८७** पुलाची लांबी

**६ पदरी रोड**







मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (अटल सेतू) उद्घाटन प्रसंगी



**मुंबई ट्रान्स हार्बर लिंकमुळे मुंबई - रायगड प्रवास होणार सुसाट**

# रस्ते विकासाचं विक्रमी कार्य अविरत..

तळेगाव स्टेशन ते चाकण-शिक्रापूर या संपूर्ण मार्गावर डीपीआर मंजूर करून निविदा प्रसिध्द.

राष्ट्रीय महामार्ग ४ वरील देहूरोड बायपास ते चांदणी चौक या मार्गावर किवळे ते वाकड ८.५ कि.मी. ओव्हरब्रिज कामाला गती.

देहू-आळंदी पालखी मार्ग रस्त्याचा प्रश्न संसदेत उपस्थित करून कामाला गती.

खालापूर चौक ते कर्जत रस्त्याचे काँक्रीटीकरण पुर्ण.

कर्जत-भीमाशंकर रस्त्याचे काम प्रगतीपथावर.

समृध्दी महामार्ग ते दिघी पोर्ट रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात



तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम बीओटी तत्वावर वार्षिक आराखड्याला मान्यता. केंद्रीयमंत्री मा.नितीन गडकरी यांची भेट



समृध्दी महामार्ग ते दिघी पोर्ट रस्ता काँक्रीटीकरण




कर्जत-भीमाशंकर रस्ता

# प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

| तालुका | अंतर | निधी (रक्कम) |
|---|---|---|
| उरण | ३.९७ कि.मी. | ₹३१२.०७ लक्ष |
| खालापूर | ७.४२ कि.मी. | ₹५७९.८९ लक्ष |
| कर्जत | ८.५० कि.मी. | ₹६३९.९८ लक्ष |
| पनवेल | ११.४१ कि.मी. | ₹९५८.४८ लक्ष |





# उरण मत्स्य बंदर विकास

## विकासपर्व

**करंजा नवीन मत्स्य बंदर**
**मच्छिमारांना बायोमेट्रीक कार्ड मिळवून देणे**

**कासा खडकावर उच्चतम सौरदिवे व**
**दिशादर्शक लावणे.**



### मच्छीमारबांधवांना पुन्हा बायोमेट्रिक कार्ड मिळणार
केंद्रीय मत्स्योद्योग, पशुपालन, दुग्ध विकास मंत्री परषोत्तम रूपाला यांची अनुकूलता





उरण येथील करंजा मत्स्यबंदराच्या विविध विकासकामांचे भुमिपूजन करताना



मत्स्यबंदराच्या विविध विकासकामांच्या उद्घाटना प्रसंगी
केंद्रीयमंत्री मा.पुरूषोत्तम रूपाला यांच्या समवेत



शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत जेएनपीटी अधिकाऱ्यांशी चर्चा करताना



जेएनपीटी कंटेनर टर्मिनल खाजगीकरण करण्याच्या विरोधातील मोर्चात मार्गदर्शन करताना



## करंजा नव्या मत्स्यबंदरांची ६ फुटाने उंची वाढवा

**खा. श्रीरंग बारणे यांची केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांकडे मागणी**

उरण : पुढारी वृत्तसेवा

रायगड जिल्ह्यातील उरण येथील करंजा मत्सबंदराचे नव्याने काम सुरु आहे. या बांधकामाची उंची व भरतीच्या पाण्याची उंची यामध्ये फक्त एकच फुटाचा फरक आहे. त्यामुळे मोठ्या भरतीच्यावेळी आणि जोरदार वाऱ्यामुळे लाटा तयार झाल्यावर मासेमारी नौकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे नवीन करंजा बंदराची सहा फुटाने उंची वाढवावी. नौकानयन मार्गाची (चॅनेल) ७० मीटरने रुंदी वाढवी. बंदर प्रकल्पाच्या दक्षिण बाजूला दगडाचे बांधकाम न करता सिमेंट काँक्रीटची भिंत बांधावी, अशी आग्रही मागणी खा. श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

नवीन बंदरामुळे मच्छिमारांना येत असलेल्या अडचणी खासदार बारणे यांनी जाणून घेतल्या. त्यानंतर केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री पुरुषोत्तम रुपाला यांची दिल्लीत प्रत्यक्ष भेट घेतली. मच्छिमारांना येणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. खा. बारणे म्हणाले, नवीन करंजा मत्स बंदराचे काम अंतिम टप्प्यात आहे. बंदराची उंची कमी केली जात आहे, ते धोकादायक आहे. जोरदार हवामानामुळे समुद्रातील लाटांचे पाणी आतमध्ये शिरुन मासेमारी नौकांचे नुकसान होऊ शकते. बंदराचे काम पूर्ण झाल्यानंतर उंची वाढविणे शक्य नसल्याने आताच ही उंची वाढवावी अशी मागणी त्यांनी केली आहे.



करंजा सेफ्टी झोन रद्द करावा या मागणीसाठी
केंद्रीय संरक्षणमंत्री मा.राजनाथसिंह यांची भेट



जेएनपीटीच्या खासगीकरणास कर्मचाऱ्यांचा विरोध या विषयी
केंद्रीय मंत्री मा.मनसुख मांडविया यांना निवेदन देताना

# दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मुंबई शहराजवळच्या कोपर–पनवेल भागात बांधण्यात येत आहे.
- हे विमानतळ ११.५ स्क्वे.कि.मी. परिसरात विस्तारलेले आहे.
- वेळोवेळी केंद्रसरकारकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर हे विमानतळ सुरू करण्याचा प्रयत्न.






केंद्रीय नागरी व उड्डाणमंत्री मा.ज्योतिरादित्य सिंधीया यांजसोबत





## पर्यटन विकास

**विकासपर्व**

आपलं माथेरान.. आपला पर्यटन विकास..

- राज्य सरकारमार्फत माथेरानला रू.४७ कोटींचा निधी मिळवून देण्यासाठी पाठपुरावा.
- माथेरानच्या ऐतिहासिक 'टॉयट्रेन'साठी केंद्राकडून १०० कोटींचा निधी मंजूर.
- मे २०१९ मध्ये अपघात झाल्यानंतर प्रवासी वाहतुकीसाठी बंद असलेली मिनीट्रेन सुरू व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न करून दि.२२ ऑक्टोबर २०२२ रोजी नेरळ येथून नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावरील प्रवासी वाहतूक सुरू केली.



माथेरान या हिलस्टेशनवर ई रिक्षाला परवानगी द्यावी यासाठी पर्यावरणमंत्री मा.प्रकाश जावडेकर यांची भेट



माथेरान नगरपरिषदेतील विविध विकासकामांचे उद्घाटन प्रसंगी





माथेरान नगरपरिषदेतील विविध विकासकामांचे उद्घाटन प्रसंगी



निशाणी–धनुष्यबाण

# लोणावळा विकासकामे

लोणावळा पर्यटन विकासासाठी रू.३.५ कोटींचा निधी मंजूर

लोणावळा शहरात पर्यटन विभागातील विकासकामांना विशेष निधी अंतर्गत रू.८० लाख मंजूर.

पर्यटन विभागाच्या माध्यमातून लोणावळा येथील टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट विकसित करणे.

मावळ लोकसभा मतदारसंघातील गडकोट किल्ले तुंग, तिकोना, राजमाची, विसापूर व लोहगड तसेच कर्नाळा पक्षी अभयारण्य व माथेरान–लोणावळा पर्यटन (हिल स्टेशन) या स्थानांना अत्यावश्यक सुविधा देण्याबाबत पाठपुरावा.





लोणावळा येथील मुख्य चौकातील छत्रपती शिवाजीमहाराज पुतळा परिसर सुशोभिकरण व रायवुडपार्क गार्डनचे नुतनीकरण विकासकामांचे भुमिपूजन





लोणावळ्यातील प्रसिद्ध असलेल्या लायन व टायगर पॉईंट या पॉईंटला अनेक पर्यटक येतात या परिसराचे सुशोभिकरण करण्याकरिता विकासकामांचा आराखडा संदर्भात प्रत्यक्ष जागेवर जाऊन अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करताना.



**वैभवशाली लोणावळा.. प्रगतिशील लोणावळा..**



आदिवासी विकास

विकासपर्व



# आदिवासी तुंगी पाड्यावर स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनंतर वीज पोहोचवली, तसेच सुरळीत दळणवळण दृष्टीने रस्ते निर्मिती.

**कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील तुंगी या गावाला जाणारा रस्ता निर्माण केला.**

**स्वातंत्र्यानंतर ७४ वर्षांनी तुंगी गाव रस्त्याने जोडले जाणार, खासदार निधीतून रू.२० लक्ष व जिल्हा नियोजन ५० लक्ष मंजूर.**

**खऱ्या अर्थाने देश आता स्वतंत्र होतोय.. सर्वत्र विकास पोहोचतोय !**

कर्जत तालुक्यातील तुंगी हे अंबेरपाडा ग्रामपंचायतमधील ८०० मीटर उंचीवरील गाव. या गावाच्या सभोवताली वनजमीन असल्याने जाण्यासाठी रस्ता व विजेचे खांब टाकण्यास वनविभाग परवानगी देत नव्हते. स्थानिकांना सोबत घेऊन प्रस्ताव तयार केला व सरकारकडे वर्षभर पाठपुरावा केला. वनजमिनीचा प्रस्ताव मंजुर करुन केंद्र स्तरावरील पंडित दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण जीवनज्योती कार्यक्रमांतर्गत तुंगी गावात वीज पुरवठ्यासाठी काम सुरु झाले.

६५ घरांना वीज देण्यासाठी २ किलोमीटर परिसरात ५१ खांब तसेच गावात ३१ खांब उभे केले. तसेच १०० केव्हीएचे वीज रोहित्रही बसविण्यात आले आहे. **आदिवासी पाडा म्हणुन ओळखणाऱ्या तुंगी गावात प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला वीज पोहोचली. ७० वर्षांत पहिल्यांदाच दारापुढे व घरामध्ये वीजेचे दिवे लागले.** स्थानिकांच्या चेहऱ्यावरील अत्यानंद कार्यपूर्तीचा आनंद देतो आणि उज्वल भारताचे स्वप्न नव्याने दाखवतो.



कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील तुंगी गावात पहिल्यांदाच वीज पोहचवली त्याचे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला उद्घाटन करुन जल्लोष करण्यात आला.





कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील तुंगी गावात जाण्यासाठी डोंगरमाथा फोडून रस्ता तयार करण्यात आला. याप्रसंगी गावकऱ्यांकडून उत्स्फूर्त स्वागत

# घारापुरी बेटावर एलिफंट केव्हज येथे वीज पोहोचवली.

निशाणी-धनुष्यबाण

गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक सरकार या गावात वीज पोहोचवण्याचे आश्वासन देत होते परंतु ते पूर्ण करता आले नव्हते. महायुती सरकारने मात्र केवळ एका वर्षातच घारापुरी गावाला वीज पोहचवली असून ९५० गावकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे.

घारापुरी लेणी असलेल्या या बेटाला युनेस्कोने वर्ल्ड हेरिटेज साईट म्हणून घोषित केले आहे.भारतातली सर्वाधिक प्राचीन लेणी असलेल्या या बेटाला लाखों देशी-विदेशी पर्यटक भेट देत असतात.

राज्य सरकारही एलिफंटा महोत्सव भरवून देशातील पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करते. परंतु वीज नसल्याने पर्यटकांना संध्याकाळी माघारी परतावे लागत होते. शेतबंदर, मोरबंदर आणि राजबंदर या तीन गावांमध्ये साधारणतः ९५० लोकांची वस्ती आहे. उर्जा खात्याने समुद्रात पाण्याखालून वीज पोहचवून गावकऱ्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे पर्यटन वाढीस चालना मिळणार असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.



घरोघरी वीज पोहोचल्यावर ९५० गावकऱ्यांचा आनंद अर्वननीय होता



घारापूरी बेटावर एलिफंट केव्हज येथे महावितरणची वीज वितरण कार्यक्रम तत्कालिन मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत मा. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आले

**विकासाचे दिवे उजळले घारापुरी**





## मंदिर संवर्धन व परिसर विकास

**विकासपर्व**

# एकविरा आई मंदिर संवर्धन व परिसर विकासासाठी रू. ३९.४३ कोटी निधीची मान्यता



**तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरणाकडून करण्यात येणारी कामे –**

१. संवर्धनकार्य (ASI संरक्षित क्षेत्रामध्ये) ● मुख्य मंदिराचा जीर्णोद्धार,
- नगरखान्याचा जीर्णोद्धार, स्तंभ आणि समाधीचा जीर्णोद्धार.

२. दर्शन रांग क्षेत्र दुरुस्ती करणे (ASI संरक्षित क्षेत्रामध्ये),
- आवारात पक्का बेसाल्ट दगडामध्ये पायवाट करणे,
- आवारातील राखीव भिंतींची दुरुस्ती आणि मजबुतीकरण करणे,
- सुरक्षेसाठी असमान पायऱ्या आणि राइजर दुरुस्त करणे, रेलिंग करणे.

३. पर्यटक/भक्तांसाठी सुविधा आणि इतर कामे (ASI संरक्षित क्षेत्रामध्ये)
- ASI तिकीट प्लाझा, टॉयलेटची नवीन बांधकाम/दुरुस्ती करणे.
- अग्निशमन यंत्रणा, अग्निशमन नियमांनुसार सुविधा करणे.
- लँडस्केप गार्डन करणे.
- पॉजपॉइंट एरिया/मनोरंजन क्षेत्र आणि सुरक्षा रेलिंग बांधणे.
- भाविकांना गडावर जाण्यासाठी रोप वे ची सुविधा.
- वाहनांच्या सुव्यवस्थित हालचालीसह आयोजित पार्किंग लेआउट बांधणे.
- मुंबई–पुणे महामार्ग ते कार्लालेणी पायथा मंदिरापर्यंत रस्ता चौपदरीकरण करणे.





निशाणी–धनुष्यबाण





एकविरा आई मंदिर परिसरातील विकासकामांबद्दल शासकीय अधिकारी व स्थानिक नागरीकांशी चर्चा करताना



श्री मोरया गोसावी गणपती मंदिरास
तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न.



श्री पोटोबा देवस्थान, वडगाव मावळ येथील
मंदिरास भरीव निधी उपलब्ध केला
व सुशोभिकरणास रू.१.२५ कोटी निधी मंजूर

**भंडारा डोंगर येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज गाथा मंदिर उभारणीसाठी भरीव सहकार्य**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज गाथा मंदिर परिसर–भंडारा डोंगर



# क्रांतिवीरांच्या स्मारकातून देशभक्तीचे स्मरण

**विकासपर्व**

## क्रांतीवीर चापेकर बंधू स्मारकास निधी उपलब्ध करून दिला.

क्रांतीवीर चापेकर बंधूंचा क्रांतिकारी इतिहास संपूर्ण देशाला ठाऊक आहे. क्रांतीवीर चापेकर बंधूंचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून रू.४५ कोटींचा निधी देण्यास मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली.

चिचंवडगाव येथे क्रांतीवीर चापेकर बंधुंचा जुना वाडा ही पुरातन ऐतिहासिक वास्तु आहे. नव्या पिढीला क्रांतीवीर चापेकरांचे कार्य, इतिहास माहिती होणार आहे. स्मारकात काही समूहशिल्प असणार आहेत. स्मारकाच्या तिसऱ्या टप्प्यातील दुसऱ्या भागात करायच्या कामामध्ये ऐतिहासिक पुरातन काळास साजेशी अंतर्गत सजावटीची विविध कामे आणि कलेचे साहित्य, तत्कालीन व्यक्तींचे पुतळे, पुरातन काळातील प्रसंगाचे म्युरल्स, गडकोट, किल्ले यांच्या प्रतिकृती, पुरातन भित्तीचित्रे आदी कामांचा समावेश आहे.

तसेच क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर यांच्या नावाने टपाल तिकीट सुरू करण्यासाठी केंद्रीय संचार मंत्रालयाच्या माध्यमातून पाठपुरावा करून हे टपाल तिकीट दि.८ जुलै २०१८ रोजी लोकसभेच्या सभापती मा.सुमित्रा महाजन यांच्या हस्ते चिंचवड येथे चापेकर वाड्यात प्रकाशित केले.



तत्कालिन लोकसभा सभापती मा.सुमित्राताई महाजन यांच्या शुभहस्ते क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर नावाने टपाल तिकीट प्रकाशन सोहळा



मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत क्रांतीवीर चापेकर बंधु स्मारक कामाचे सादरीकरण प्रसंगी



संकल्पित चित्र

# क्रीडा आणि तरुणांना प्रोत्साहन

निशाणी-धनुष्यबाण




व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमी येथील पॅव्हेलियनचे लोकार्पण प्रसंगी



## वेंगसरकर अकादमीचे स्वप्न साकार!

### ऋतुराज गायकवाडची हिंदुस्थानी संघात निवड झाल्याबद्दल अभिनंदन



श्रीरंग बारणे

पिंपरी : महापालिकेत थेरगावचे प्रतिनिधित्व करीत असताना दूरदृष्टी ठेवून विविध प्रकल्प केले. शहरातील क्रिकेटप्रेमींना सराव करता यावा, शहरातून देशासाठी खेळणारे खेळाडू घडावेत, हा उद्देश ठेवून थेरगावातील एका मोकळ्या मैदानावर दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी उभारली. या अकादमीत सराव करणारा खेळाडू भविष्यात देशासाठी खेळावा, हे माझे स्वप्न होते. वेंगसरकर अकादमीतील खेळाडू आणि सांगवीतील रहिवासी ऋतुराज गायकवाड याची श्रीलंका दौऱ्यासाठी हिंदुस्थानी क्रिकेट संघात निवड झाली. त्यामुळे अकादमी उभारण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. तसेच, ऋतुराजचे त्यांनी अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

हिंदुस्थान आणि श्रीलंका यांच्यात जुलैमध्ये एकदिवसीय व टी-२० मालिका होणार आहे. वेंगसरकर अकादमीतील खेळाडू ऋतुराज गायकवाडची हिंदुस्थानी संघात निवड झाली आहे. त्यानिमित्ताने ऋतुराजचे कौतुक होत आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकाराने ही अकादमी उभारण्यात आली आहे.

खासदार बारणे म्हणाले, 'महापालिकेत थेरगावचे प्रतिनिधित्व करत असताना पिंपरी-चिंचवड महापालिका आणि वेंगसरकर यांच्या मदतीने दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी उभारली. अकादमीच्या उद्घाटनाला क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर आणि हिंदुस्थानी संघाचा सर्वात यशस्वी कर्णधार महेंद्रसिंग धोनी यांना आणले होते. त्यांच्या हस्ते या क्रिकेट अकादमीचे उद्घाटन झाले. या अकादमीत सराव करणारा खेळाडू भविष्यात देशासाठी खेळावा हे माझे स्वप्न होते. वेंगसरकर अकादमीतील खेळाडू ऋतुराजचा हिंदुस्थानी संघात समावेश झाला आहे. त्यामुळे माझे स्वप्न पूर्ण झाले. ऋतुराज सुरुवातीपासून वेंगसरकर अकादमीत सराव करत होता. आज त्याचा हिंदुस्थानी क्रिकेट संघात समावेश झाला आहे. याचा मला सार्थ अभिमान वाटतो, असेही बारणे म्हणाले.

" वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मैदानावर पूर्वी आजूबाजूचे नागरिक सकाळी प्रात:विधीला जात होते. आमचे मित्र दिलीप वेंगसरकर यांच्या पुढाकारातून या ठिकाणी आम्ही अकादमी सुरू केली तेव्हा येथे कोण खेळायला येणार, अशी लोकांनी टीका केली होती. मात्र, आज त्याच मैदानावर सराव करणाऱ्या ऋतुराज गायकवाडचा हिंदुस्थानी क्रिकेट संघात समावेश झाला आहे. ऋतुराज देशासाठीही नक्कीच चांगली कामगिरी करेल, असा मला विश्वास आहे.

**- श्रीरंग बारणे, खासदार**

ऋतुराज गायकवाडची भारतीय संघात निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना



क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना




बेरोजगार तरूणांना स्वयंरोजगारासाठी विविध योजनांचे मार्गदर्शन मेळावा आयोजन



पिंपरी चिंचवड शहरात तरूण-तरूणींसाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन



इ.१० वी. व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव प्रसंगी



स्थानिक युवकांना क्रीडा ग्राउंड उपलब्ध करून दिल्याबद्दल युवकांनी आभार व्यक्त केले.



# शासन आपल्या दारी

**विकासपर्व**

पिंपरी–चिंचवड, पुणे ग्रामीण भागातील झालेल्या शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत २ लाख ८६ हजार २८७ नागरिकांनी लाभ घेतला आहे. तर, त्यापैकी आतापर्यंत थेट रू.४८ कोटींचे लाभ वितरीत करण्यात आले आहेत.

या उपक्रमाअंतर्गत उत्पन्नाचा दाखला, नवीन मतदार नोंदणी, रहिवासी दाखला, सातबारा, आठ अ, हवेली तालुक्यातील रहिवाशांकरिता जातीचा दाखला, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखला, ३३% महिला आरक्षण दाखला, ज्येष्ठ नागरिकत्वाचा दाखला काढून देणे, आधार कार्डमधील नवीन दुरूस्ती व अद्यावत करणे, मतदार कार्ड आधार कार्डशी लिंक करणे, रेशन कार्डवरील नाव कमी करणे, नाव वाढविणे, संजय गांधी निराधार अनुदान योजना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचा दाखला, नॉन क्रिमीलिअर, पोस्ट ऑफिसचे प्रमाणपत्र, उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचा दाखला काढून देण्याचे स्टॉल होते.

तसेच मावळ महसूल विभागाने महाराजस्व अभियानाअंतर्गत वडगावात आयोजित केलेल्या तालुकास्तरीय शासन आपल्या दारी या उपक्रमात १०८३ नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.














'शासन आपल्या दारी' अभियानात १०८३ जणांना लाभ

योजनानिहाय लाभार्थी संख्या पुढीलप्रमाणे

# पवना धरण संदर्भातील कामे

१. पवना धरणातील गाळ लोकसहभागातून सलग ८ वर्षे काढला.

२. सन २०१४ पासून ७२ हजार क्युबिक मीटर गाळ पवना धरणातून काढण्यात आला. यामुळे पवना धरणाच्या पाणीसाठवण क्षमतेत मोठी वाढ झाली आहे.

३. स्थानिक शेतकरी आणि सामाजिक संघटनांच्या मदतीने पवना धरणातील गाळ काढण्यात येतो. याचा फायदा, पिंपरी चिंचवड शहरासह तळेगाव, देहूरोड एमआयडीसी आणि हिंजवडी आयटी पार्क यांना होणार आहे.

४. भविष्यातील पाणी टंचाईचे संकट टाळण्यासाठी आणि धरणातील पाणीसाठा वाढविण्यासाठी धरणातून सलग ८ वर्षे गाळ लोकसहभागातून काढला.

५. पवना धरणग्रस्तांचे पुनर्वसन संदर्भात राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी पाठपुरावा केला.












# आरोग्य

## विकासपर्व

खा. श्रीरंग बारणे व दिव्यांग विभाग सामाजिक न्याय मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबीरात एडीआयपी योजने अंतर्गत कर्णबधिरांसाठी कानाची मशिन, अंध दिव्यांगासाठी काठी, पायाने अधू असलेल्यांना व्हीलचेअर इ. साहित्य वाटप.

मावळ लोकसभा मतदारसंघातील २७१ लाभार्थ्यांना विविध साहित्यांचे वाटप.

केंद्र सरकारच्या योजनांच्या माध्यमातून मावळ लोकसभेच्या सर्व मतदारसंघामध्ये अपंग व्यक्तींची तपासणी शिबीरे आयोजन करून त्यांना मोफत साहित्य वाटप करण्यात आले.

थेरगाव येथे महाआरोग्य शिबीराचे आयोजन.





**अपंगाना मिळाला प्रगतीचा हात.. जनसेवेच्या भावनेने दिली कार्यास साथ..**



# आरोग्य मेळावे व शिबीरे





पनवेल उपजिल्हा रूग्णालय येथे आझादी का अमृत महोत्सव निमित्त आयुष्यमान आरोग्य मेळावा घेताना





जिल्हा रूग्णालय औंध येथे आझादी का अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भव्य आरोग्य मेळावा घेताना



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव रूग्णालयास
रू.२२ लाख किमतीचे वैद्यकिय साहित्य व सामुग्रीची मदत करताना



थेरगाव येथील महाआरोग्य शिबीर



दिव्यांगांना मोफत साहित्य वाटप शिबीर प्रसंगी



कर्जत येथील आरोग्य तपासणी शिबीर प्रसंगी



**विकासपर्व**

# कोरोना काळातील कार्य

१. लॉकडाऊन काळात दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप केले.

२. खासदार श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाऊंडेशनच्या सहकार्याने निगडी प्राधिकरणातील लोकमान्य हॉस्पिटलमध्ये ६७ बेडचे कोविड केअर सेंटर चालू केले. त्यामध्ये ऑक्सिजन, आयसीयू, व्हेंटिलेटर बेडचा समावेश होता.

३. पनवेलच्या उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यात आले.

४. कोरोनाबाधितांसाठी झोकून देऊन काम केल्यानिमित्त मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस या लंडनमधील संस्थेच्या मानाच्या यादीत समावेश करण्यात आला.

५. कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेपासून ते दुसरी लाट या संकट परिस्थितीमध्ये मावळ लोकसभा मतदारसंघात कोरोनाचे संक्रमण काळात कोरोनाबाधित रूग्णांना स्थानिक पातळीवर आणि वेळेत उपचार व्हावेत यासाठी मतदारसंघात वेळोवळी बैठका घेऊन मदत केली.

६. हातावर पोट असलेल्या नागरीकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांना मदत केली. अन्नधान्य वाटप, कोरोना हॉस्पिटलसाठी साहित्यांची मदत, कोरोना रूग्णांचे बील कमी करण्यासाठी प्रयत्न केले. बिलांची रक्कम कमी करून दिली.

७. कोव्हीड काळात औंध जिल्हा रूग्णालय व कर्जत, पनवेल, खोपोली, कान्हे रूग्णालयामध्ये मल्टीपॅरा मॉनिटर आणि व्हेंटीलेटर देण्यात आले.



**कोरोना जागतिक महामारी काळात केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन**
**वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस्**
**मध्ये समावेश**

***कोरोनाशी करून दोन हाथ.. संकटात लढलो येऊन एकसाथ..***



निशाणी-धनुष्यबाण



केंद्रीय आरोग्यमंत्री मा. हर्षवर्धन यांची भेट




कर्जत उपजिल्हा रूग्णालयास
दोन ऑक्सिजन कॉन्सलेटर्स भेट देताना




वडगाव मावळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास
दोन ऑक्सिजन कॉन्सलेटर्स भेट देताना




कोविड केअर सेंटरची पाहणी करताना



# मुख्यमंत्री सहाय्यता निधीस पन्नास लाख

**श्रीरंग बारणे : कोरोनासाठी मदतीचा हात**

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : कोरोनाच्या लढ्यासाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पन्नास लाखांची मदत केली आहे. 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' खात्यामध्ये खासदार निधीतून पन्नास लाख रुपयांचा निधी वर्ग करण्याचे पत्र खासदार बारणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, समाजातील विविध घटक मदतीचा हात देण्यासाठी पुढे आले आहेत. संपूर्ण जगभरात कोरोनाचा प्रादुर्भाव झाला असून मोठे संकट ओढवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २१ दिवस देशभरात लॉकडाऊन पुकारला आहे. या संकटावर मात करण्यासाठी मदत करण्याचे आवाहन राज्य सरका[...] आहे. त्या आवाहनाला प्रति[...] मावळचे शिवसेना खासद[...] बारणे यांनी मदत के[...] कोरोनाच्या प्रादुर्भावामु[...] सरकार घेत असलेल[...] तरतुदीसाठी मुख्यमंत्री स[...] कोविड १९ खात्या[...] निधीतून ५० लाखां[...] यांनी जमा केला आ[...]

## घराबाहेर पडणे टाळा

खासदार बारणे म्हणाले, 'देशावरील हे संकट मोठे आहे. प्रत्येकाने आपापल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कोणीही घराबाहेर पडू नये. लॉकडाऊन कालावधीत सर्वांनी घरी राहून सरकारला सहकार्य करावे. सरकारच्या सूचनांचे पालन करावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. वारंवार साबणाने हात धुवावेत."

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये समावेश झाला. त्यानिमित्त सत्कार करण्यात आला.

# वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये श्रीरंग बारणे यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : कोरोना कालखंडात काम केल्यानिमित्त मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स या लंडनस्थित संस्थेच्या मानाच्या यादीत समावेश झाला आहे.

संस्थेचे सचिव डॉ. दीपक हरके, महाराष्ट्र उपाध्यक्ष महबूब सय्यद यांच्या हस्ते खासदार बारणे यांना स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर दीड वर्षांपूर्वी देशात लॉकडाऊन लागू करण्यात आला होता. या महामारीच्या काळात खासदार बारणे यांनी मतदारसंघातील नागरिकांना दिलासा देण्याचे मोठे काम केले. कोविड रुग्णालय उभारण्यासाठी पुढाकार घेतला. हातावर पोट असलेल्या नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांना मदत केली.

खासदार बारणे म्हणाले, "कोरोना महामारीच्या काळात मतदारसंघातील नागरिकांना एकटेपणा जाणवू दिला नाही.

लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या मदतीला धावून गेलो. वैद्यकीय उपचाराच्या सुविधा निर्माण केल्या. नागरिकांना योग्य उपचार मिळण्यासाठी मदत केली. (वा. प्र.)



## नैसर्गिक आपत्ती मदत

**विकासपर्व**









रायगडच्या खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळल्याने गाव मलब्याखाली गाडलं गेलं होतं. यात अनेक गावकऱ्यांचा मृत्यू झाला होता. यानंतर याठिकाणी मदत कार्य करण्यात आलं. येथील रहिवाश्यांसाठी सरकारने खालापूर चौक या भागात सुंदर गांव उभं केलं आहे. इर्शाळवाडीतील ग्रामस्थांना सरकारकडून अन्न, वस्त्र आणि निवारा या सुविधा पुरवण्यात येत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्यासोबत स्वातंत्र्य दिनानिमित्त या ठिकाणी असलेल्या निवारा केंद्राची पाहणी केली. या वेळी इर्शाळवाडीच्या जनतेशी संवाद साधला.



# निसर्ग चक्रीवादळ व अतिवृष्टी

निशाणी-धनुष्यबाण






निसर्ग चक्रीवादळाने पुणे व रायगड जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची पाहणी करून धनादेश व साहित्य वाटप करताना.





अतिवृष्टीमुळे मावळ तालुक्यातील पाचाणे, पुसाणे, आढले, उर्से, कर्जत तालुक्यातील कडाव, माणीवली, सुगवे, कोल्हारे, बीरदोले आणि खालापूर तालुक्यातील महड, वरद, निंबोडी या गावातील भात पिकाची नुकसानीची पाहणी करताना.





# पिंपरी चिंचवड शहरातील विविध विकासकामे

**विकासपर्व**

- पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकामांवर आकारलेला शास्तीकर कायमचा बंद केला.
- पिंपरी-चिंचवड शहरातील प्राधिकरणबाधित शेतकऱ्यांचा १२.५% परतावा देणेबाबत पाठपुरावा केला.
- पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करणेबाबत राज्य सरकारला पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावला.
- पिंपरी-चिंचवड प्राधिकरण (पीसीएनडीटी) मधील बांधकामे महानगरपालिकेमध्ये वर्ग करण्यात आली आहे. सदरच्या जागेवर अनधिकृत बांधकामे आहेत. या जागेची मालकी अनधिकृत मिळकत धारकांच्या नावावर करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात पाठपुरावा.
- पवना, इंद्रायणी, मुळा-मुठा नदीसुधार प्रकल्पास मान्यता देणेबाबत पाठपुरावा करत आहे.
- पिंपरी-चिंचवड शहर घनकचरा व्यवस्थापनबाबत पाठपुरावा केला.



पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकामांवर आकारलेला शास्तीकर कायमचा बंद केल्याबद्दल मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांचे आभार मानताना



पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पा संदर्भात केंद्रीय जलशक्ती मंत्री मा.गजेंद्रसिंह शेखावत यांना निवेदन देताना



पिंपरी-चिंचवड मनपा येथे पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाबाबत उद्योगमंत्री मा.उदय सामंत यांच्या सोबत बैठक



सायन्स सिटी संदर्भात शिक्षणमंत्री मा.दिपक केसरकर यांच्या सोबत बैठक

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात केंद्र सरकार व राज्य सरकारकडून प्राप्त निधी

| कामाचे नाव | केंद्र सरकार | राज्य सरकार |
|---|---|---|
| अमृत पाणी पुरवठा योजना | ६६.५६ कोटी | ३३.३३ कोटी |
| बगीचा निधी | ३.६६ कोटी | ०.५८ कोटी |
| अमृत मिशन सेव्हरेज | ४८.०९ कोटी | १३.०३ कोटी |
| पंतप्रधान आवास योजना | ३२.५४ कोटी | १८.५७ कोटी |
| स्वच्छ भारत अभियान | ५.७८ कोटी | ४.०७ कोटी |
| १५ व्या वित्त आयोग पिं.चिं.आयुक्त | २२२.२८ कोटी | – |




एच.ए. कंपनी सुरू करण्यासाठी कोट्यावधी रूपयांचे आर्थिक बजेट केंद्र सरकारकडून मंजूर करून घेतले.



महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने प्रस्तावित केलेला पुणे जिल्ह्यातील रिंगरोड कामांसंदर्भात मा.मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांची भेट घेताना.



पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील विविध समस्याबाबत प्राधिकरण कार्यालय आकुर्डी येथे बैठक प्रसंगी



पिंपरी येथे सुरू केलेले पासपोर्ट कार्यालय



**वेगाने घोडदौड करतोय पिंपरी-चिंचवडचा विकासरथ !**



**विकासपर्व**

# मावळ मतदारसंघातील विकासकामांचे सुयोग्य नियोजन

**खासदार निधी, जिल्हा नियोजन, सामाजिक न्याय विभाग, २५/१५ निधी, नगरविकास, नागरी मुलभूत सोई-सुविधा, नगरपरिषद, पर्यटन विकास इ.** विविध योजनांमार्फत निधी उपलब्ध करून मतदारसंघात रस्ते तयार करणे, रस्ते कॉंक्रीटीकरण, सभामंडप बांधणे, स्मशानभूमी, निवाराशेड, बसथांबा, साकवपूल, व्यायामशाळा, शाळा दुरूस्ती करणे, अंगणवाडी इमारत, उद्यान विकसित करणे, ओपन जिम, बैठक व्यवस्थेसाठी बाकडे बसविणे, वृक्ष लागवड, हायमास्ट दिवे, बंदिस्त गटार इ. लोकोपयोगी विकासकामे मार्गी लावली.

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने **जल जीवन मिशन कार्यक्रम** अंतर्गत मावळमधील ११४ गावांत पाणी पुरवठा योजना राबविली.
तसेच नळ पाणी पुरवठा व उंच टाकीचे बांधकामे करून **ग्रामीण पाणी पुरवठा योजना** राबविली.



सुयोग कॉलनी, रहाटणी येथील कॉंक्रीट रस्त्याचे भूमिपूजन प्रसंगी



निगडी-रावेत-लिंकरोड या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण भूमिपूजन प्रसंगी



बापदेवनगर,सिद्धीविनायक कॉलनी,किवळे येथील ओपनजीमचे उद्घाटन प्रसंगी



किंग मार्शल आर्टस या संस्थेस रेसलिंग मॅट देण्यात आले



किवळे येथे सिंमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्याचे उद्घाटन प्रसंगी.



पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायट्यांमधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण

निशाणी-धनुष्यबाण















पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायट्यांमधील
अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण



श्रीक्षेत्र देहू येथील विकासकामांचे उद्घाटन प्रसंगी



वैष्णवी सोसायटी, वडगाव मावळ येथील सिमेंट काँक्रीटीकरण रस्ता



साते, ता.मावळ येथे शिवसृष्टी उभारण्यासाठी भरीव निधी उपलब्ध केला.



वडेश्वर मावळ येथील आश्रमशाळेला साहित्य वाटप प्रसंगी



प्रगती विद्या मंदीर, इंदोरी ता.मावळ कामाचा शुभारंभ



निशाणी-धनुष्यबाण



ओझडे, ता.मावळ येथील सिमेंट काँक्रीटीकरण रस्ता



वडेश्वर, ता.मावळ येथील सामाजिक सभागृह



सडवली, ता.मावळ येथील सिमेंट काँक्रीटीकरण रस्ता



मावळ येथील स्मशानभूमी शेड



कामशेत, ता.मावळ येथील सौरदिवे



पाचाणे, ता.मावळ येथील साकव पूल







खालापूर शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक नुतनीकरण व चौक सुशोभिकरणाचे लोकार्पण करताना



वरोसेवाडी, ता.खालापूर येथील सभामंडप



कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील समाजमंदिर व व्यायामशाळा लोकार्पण प्रसंगी



वावोशी,ता.खालापूर येथील सभामंडप उद्घाटन प्रसंगी



होराळे,ता.खालापूर येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर सभामंडप लोकार्पण प्रसंगी



बोर्ले, पनवेल येथील विसर्जन घाट



हातनोली गाव, ता.खालापूर येथील रस्ता सिमेंट काँक्रीटीकरण



# गंभीर आजारांमध्ये मदतीचा हात

विकासपर्व

निशाणी-धनुष्यबाण

## पंतप्रधान सहाय्यता निधीतून रुग्णांना आर्थिक मदत

| रुग्णांचे नाव | पत्ता | रक्कम |
|---|---|---|
| श्रीम.संगिता सुभाष आरते | तळेगाव दाभाडे, पुणे. | ५०,०००.०० |
| श्री.दृष्णा दत्तात्रय पोरे | देहुरोड,किवळे, पुणे. | २,२८,११५.०० |
| श्री.संतोष हरिभाऊ नवले | नवी पनवेल, रायगड | १,५९,५०९.०० |
| श्री.झनकराज जयराम जोशी | निगडी, पुणे | १,४८,३५२.०० |
| सौ.नंदा संजय तिकाडे | ठाकरवाडी,मावळ, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.सुजित रामानन | कळंबोली,पनवेल, रायगड | ३,००,०००.०० |
| श्री.कुणाल सुदाम कोतवाल | कोरेगाव भिमा,पुणे | ३,००,०००.०० |
| श्लोक म्हात्रे | मोहोपाडा,चंभारली, रायगड | ७५,९८८.०० |
| श्री.पृथ्वीराज राजेंद्र देशमुख | वाकडरोड, हिंजवडी, पुणे | ३,००,०००.०० |
| श्रीम.अलका भास्कर चौधरी | प्राधिकरण निगडी, पुणे | ५०,०००.०० |
| सौ.श्रेया नरोटे | चिंचवड, पुणे | ३,००,०००.०० |
| सौ.तन्वी रामदास घरत | वेव कोशाने, रायगड | २,२५,०००.०० |
| सौ.सायली अरूण मुंढे | मोहोपाडा,खालापूर, रायगड | २,५०,०००.०० |
| श्री.उमरकासिम तांबोली | रहाटणी, पुणे | २,२१,५२०.०० |
| श्री आकाश पाटील | दापोली, पारगाव, रायगड | ३,००,०००.०० |
| श्री.अशोक शितोळे | कर्जत, आंबोली, रायगड | २,३०,०००.०० |
| श्री.संकेत चंद्रकांत मडके | वाकसाई, वेहरगाव, पुणे | २,००,०००.०० |
| सौ.अराध्या भागवत अहिरे | निगडी, पुणे | ३०,८९२.०० |
| सौ.संस्कृती अरूण पाटील | देहु आळंदी रोड, पुणे | १,९५,६८०.०० |
| श्री.चंद्रकांत सावळेराम पाडेकर | प्राधिकरण आकुर्डी, पुणे | १,००,०००.०० |
| विहान रणजीत ढवळे | पिंपरी, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.राममिलन सौदागर चौरसिया | रहाटणी गाव, पुणे | १,५०,०००.०० |
| वेदांत अमोल सुवासे | दापोडी, पुणे | ५०,०००.०० |
| सौ.वर्षा शिंदे | पळसदरी,माथेरान,रायगड | १,५७,५००.०० |
| श्री.रजनिश कृष्णदास मेहता | लोणावळा, पुणे | ३,००,०००.०० |
| सौ.सैजादी शाह | नवाडागावी,पनवेल, रायगड | १,५०,०००.०० |
| श्रीम.आरती राजू अंबानी | पिंपरी, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.जयसेन माधव डावरे | पिंपळे निलख, पुणे | २,११,५६१.०० |
| मनिष परशुराम भगत | चिंचवाली, रायगड | २,२५,०००.०० |
| सौ.ख्याती शिवकुमार अगरवाल | येलवाडी,देहुगाव, पुणे | ३,००,०००.०० |
| श्री.प्रभाकर फकिरचंद पालिवाल | काळेवाडी,पिंपरी, पुणे | १,२१,७४०.०० |
| सौ.ममता मनोहर चिरनेरकर | तळोजा,रायगड | ३,००,०००.०० |
| सोनल नामदेव आखंडे | नाणे मावळ, पुणे | ५०,०००.०० |
| श्रीम.बेबी जनार्दन भोईर | मांदवणे, रायगड | १,००,०००.०० |
| श्रीम.अरूणा अशोक येणडोले | काळेवाडी, पुणे | ३,००,०००.०० |
| श्री.विजय एकनाथ टाव्हरे | वारजे, पुणे | १,२५,०००.०० |
| श्रीम.उज्वला विश्वनाथ लेंडघर | भांगवाडी, लोणावळा, पुणे | १,४८,२५९.०० |
| श्री.जयंतीलाल राठोड | निगडी, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.नजीर अब्दुल शेख | चिखली, पुणे | ३,००,०००.०० |
| श्रीम.आशा दामोदर पाटील | वावोशी, खालापूर,रायगड | ५०,०००.०० |
| संस्कार शामराव सूळ | काळेवाडी, पुणे | २,००,०००.०० |
| सौ.प्रिया प्रविण पवार | ताथवडे, पुणे | ५०,०००.०० |
| सौ.तनिष्का संतोष झेंडे | दळवीनगर, चिंचवड, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.अरविंद साधू भंडारे | पिंपरी कॅम्प, पुणे | ५०,०००.०० |
| सौ.पायल संदिप नखाते | दत्तनगर,थेरगाव, पुणे | ५०,०००.०० |
| श्री.मनोज खेंगरे | वडगाव मावळ, पुणे | ३,००,०००.०० |
| श्रीम.श्रद्धा सचिन विकारी | डोंगरगाव, लोणावळा,पुणे | २,९५,७५५.०० |

| रुग्णांचे नाव | पत्ता | रक्कम |
|---|---|---|
| श्री.शांताराम रंगनाथ जाधव | जाधववाडी,चिखली,पुणे | ५०,०००.०० |
| श्रीम.मंगल विकी कदम | देहुरोड, पुणे | ५०,०००.०० |
| श्लोक ज्ञानेश्वर ढेरंगे | अंबीदुमला,बोटा,अहमदनगर. | ३,००,०००.०० |
| श्रीम.माधवी श्रीकांत कदम | प्राधिकरण निगडी, पुणे | १,५०.०००.०० |
| श्री.सत्यवान नामदेव भोसले | वडगाव मावळ, पुणे | ३,००,०००.०० |
| श्री.सादिक महम्मद युनूस शेख | ममतानगर,औंध, पुणे | १,६५,९८०.०० |
| हर्ष विरभद्र मगदूम | मोशी,हवेली, पुणे | ३,००,०००.०० |
| श्री.समीर येलवंडे | थेरगाव, पुणे | ३,००,०००.०० |
| श्रीम.मीना चिंतामण कंबारी | कर्जत,कोशाने, रायगड | १,००,०००.०० |
| श्रीम.सुनिता अजय महामुनी | तळेगाव दाभाडे, पुणे | २८,०४०.०० |
| श्री.सुरेश मच्छिंद्र साठे | नारायणडोहो, अहमदनगर. | १,५०,०००.०० |
| सौ.विद्या विठ्ठल सरपटे | कामगारनगर, पिंपरी, पुणे. | ३,००,०००.०० |
| श्री.धनाजी घरत | डावरे, जोहे, रायगड | २,७४,५००.०० |
| ऋषिकेश गुरूनाथ कोळी | काळुंद्रे, पनवेल, रायगड | २,६२,५००.०० |
| श्रीम.शारदा वसंत रोकडे | पिंपळे गुरव,नवी सांगवी,पुणे | ५०,०००.०० |
| श्रीम.सुजाता मंगेश मोरे | जांभवळी, रायगड | १,००,०००.०० |
| शिरीन इम्तियाज खोत | शिळफाटा,खोपोली, रायगड | ३,००,०००.०० |
| श्री.सुधीर कांता उत्तेकर | शिळफाटा, खालापूर, रायगड | २,६२,५००.०० |
| श्रीम.मनिषा प्रमोद जाधव | कामोठे, पनवेल, रायगड | २,६२,५००.०० |
| श्री.सचिन गोविंद शिंदे | मालवंडी धुळे, पुणे | ३,००,०००.०० |
| श्रीम.सुनंदा शशिकांत पाटणे | चिंचवड, पुणे | ८०,०००.०० |
| श्रीम.शकुंतला दायरे | मनीवली, कर्जत, रायगड | ५०,०००.०० |
| श्री.लक्ष्मण मारूती सावंत | खोपोली,साजगाव,रायगड | ५०,०००.०० |
| अनिता हनुमंत जाधव | पुसणे, मावळ, पुणे | ३,००,०००.०० |
| श्री.दिलीप भोलाकुमार साहू | खारघर, रायगड | २,६२,५००.०० |
| श्री.अनुप ए.झाडे | रावेत, पुणे. | ३,००,०००.०० |
| श्री.समाधान उल्हास चव्हाण | जगताप डेअरी,विशालनगर, पुणे. | १,७५,०००.०० |
| स्वागतकुमार चंद्रकांत बिराजदार | कस्पटेवस्ती, वाकड, पुणे | ३,००,०००.०० |
| सिद्धी अनिल गवळी | आनंदनगर, तळेगाव, पुणे | ३,००,०००.०० |
| प्रभाकर सिद्धराम कोळी | अक्कलकोट, सोलापूर | १,९६,७३३.०० |
| श्रीम.ज्योतीप्रिया राजेंद्र कोईम्बतोरे | खांदा कॉलनी, पनवेल, रायगड. | ३,००,०००.०० |





# खासदार आपल्या दारी..

विकासपर्व

## सर्वसामान्यांना हवेहवेसे वाटणारे लोकप्रिय नेतृत्व







# विविध समस्या सोडविण्यासाठी श्रीरंग बारणे यांना साकडे

**जनता दरबार : वाचनालये, विरंगुळा केंद्रांच्या प्रश्नांबाबत गाऱ्हाणे**

लोकमत न्यूज नेटवर्क



पनवेल मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या ऐकून घेताना खा. श्रीरंग बारणे.

पनवेल : मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सोमवारी सेनेच्या खारघर शहरातील मध्यवर्ती कार्यालयात जनता दरबाराचे आयोजन केले होते. या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी आपल्या प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी बारणे यांना साकडे घातले.

लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पार पडल्यानंतर प्रथमच खासदार बारणे यांच्यामार्फत जनतेच्या भेटीसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात खारघर, कामोठे, पनवेल, शहर पनवेल - ग्रामीण आदी भागांतील रहिवाशांनी आपली हजेरी लावली होती. पनवेल महापालिकेचे शेकापचे नगरसेवकदेखील उपस्थित होते.

जनता दरबारात विशेषत: ज्येष्ठ नागरिकांची संख्या उल्लेखनीय होती. शहरातील वाचनालये, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्रे आदी प्रश्नांबाबत खासदारांकडे गाऱ्हाणे मांडले. पालिका क्षेत्रातील गटई कामगारांचा प्रश्नदेखील या वेळी खासदारांकडे मांडण्यात आला. पनवेल तालुक्यातील ग्रुपग्रामपंचायत आपटा येथील कोरलवाडी आदिवासी वाडीत अद्यापही प्राथमिक सुविधांचा अभाव आहे. यासंदर्भात ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांनी बारणे यांना निवेदन देऊन उपाययोजना करण्याची मागणी केली. शेकापचे नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी कासाडी नदीच्या प्रदूषणाबाबत हरित लवादाने संबंधित वेगवेगळ्या प्रशासनाला योग्य ते आदेश दिले असल्याचे सांगितले. या वेळी कासाडी नदीला पुनर्जीवित करण्यासाठी हरित लवादाने आदेश देऊनदेखील नदीच्या पुनर्जीवित करण्याच्या कामाला टाळाटाळ केली जात असल्याचे म्हात्रे यांनी खासदारांना सांगितले.

तळोजा एमआयडीसीमधील प्रदूषणाचा विषय लोकसभेत उपस्थित केला जाईल, असे आश्वासन या वेळी बारणे यांनी दिले. कामोठे शहरातील समस्यांसंदर्भात कफच्या सदस्य रंजना सडोलीकर यांनीदेखील खासदार बारणे यांच्याशी संवाद साधला. या वेळी जिल्हा प्रमुख शिरीष घरत, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, रामदास पाटील, भरत पाटील, दीपक निकम, राकेश गोवारी, मनेश पाटील आदी उपस्थित होते.

बारणे यांनी, उपस्थितांचे प्रश्न, समस्या ऐकून घेत यासंदर्भात वैयक्तिक पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. मतदारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन भविष्यातदेखील केले जाईल, असे बारणे यांनी स्पष्ट केले.





निशाणी-धनुष्यबाण









# विकासाची दूरदृष्टी असणारे जनसामान्यांचे नेतृत्व











## जनता दरबार, आपल्या माणसांच्या गाठीभेटी..

**विकासपर्व**

सर्वसामान्य जनतेच्या
हक्काचे ठिकाण..
थेरगाव (चिंचवड)
व पनवेल येथील
**जनता दरबार..**




















निशाणी-धनुष्यबाण















आपलं मत धनुष्यबाणाला..

आपलं मत मोदी सरकारला..

निशाणी–धनुष्यबाण

आपल्या माणसांसाठी..

मावळच्या विकासासाठी..

# खासदार
# श्रीरंग आप्पा बारणे

मावळ लोकसभा मतदार संघ



प्रकाशक : श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाऊंडेशन मुद्रण दि. : ०९.०३.२०२४ मुद्रक : मधुबन प्रिंट सोल्युशन – ९९७०१४१५९९ प्रती : ३,०००